

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 115

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार १७ जुलै, १९६८ | अंक १४




STUSA 8/66

नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, उसाचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगायंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे – ९

### आरोग्य आणि संपत्ती ह्यांचे संबंध

आरोग्य म्हणजेच खरी संपत्ती अशा आशयाची म्हण बहुतेकांना परिचित आहे. पण व्यवहारात मात्र संपत्ती आरोग्याशिवाय विविध स्वरूपे धारण करताना दिसते. सामान्यतः जितका पैसा अधिक तितका मनुष्य सुखी असेच मानण्यात येते आणि सुखात आरोग्याचा समावेश असावाच लागतो. दिल्लीमधील एका डॉक्टरांनी केलेल्या आरोग्यविषयक पाहणीत मात्र निराळेच चित्र दिसून आले. त्यांना असे आढळून आले की, उत्पन्नाचे मोठे आकडे असलेल्या कुटुंबांतून रक्तदाब, हृदयविकार इत्यादी विकारांचे प्रमाण अधिक आहे. पाहणीसाठी डॉक्टरांनी कुटुंबांची मासिक उत्पन्नाप्रमाणे वर्गवारी केली होती. पहिला वर्ग ज्या कुटुंबांचे मासिक उत्पन्न २ हजार अगर त्यापेक्षा अधिक आहे त्यांचा होता. ह्या गटातील १० कुटुंबांपैकी ४ कुटुंबांत एकापेक्षा अधिक दीर्घकालीन आजार चालू होते. त्यानंतर मासिक १,५०० ते २,००० रुपयांचा गट तपासण्यात आला असता हे प्रमाण ३ वर आलेले आढळले. ज्यांचे मासिक उत्पन्न १ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे अशा कुटुंबांत रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह आणि कॅन्सर ह्या रोगांचे प्रमाण बरेच आढळून आले. तथापि, मासिक २५० रुपयांपासून १ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांतून वरील रोगांचा आढळ झाला नाही असे मात्र नाही. मात्र त्यांच्या प्रमाणात बरीच घट दिसून आली. सधन कुटुंबांत आरोग्यमान चांगले राखण्याइतका सकस आहार उपलब्ध असलाच पाहिजे असे असतानासुद्धा ह्या कुटुंबांवर रोगांची छाया पसरलेली दिसते. तेव्हा त्याची कारणे निराळी असली पाहिजेत.







# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ जुलै. १९६८





*संस्थापक :*
**प्रा. वामन गोविंद काळे**
*संपादक :*
**श्रीपाद वामन काळे**

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*


### पंचवार्षिक योजना अयशस्वी का झाल्या ?

'चौथ्या पंचवार्षिक योजनेकडे पाहण्याचा दृष्टिकोण' ह्या विषयावर हैद्राबाद येथे एक परिसंवाद भरविण्यात आला. इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संघटनेतर्फे भरविण्यात आलेल्या ह्या परिसंवादात भारताचे माजी अर्थमंत्री डॉ. सी. डी. देशमुख ह्यांचे भाषण झाले. डॉ. देशमुख आपल्या भाषणात म्हणाले, की पंचवार्षिक योजनांच्या अपयशाची दोन मुख्य कारणे आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कारभार गलथानपणे हाकण्यात आला हे एक कारण; दुसरे मात्र निसर्गाच्या लहरीचे म्हणजे अपुऱ्या पर्जन्यमानाचे आहे. परदेशीय चलनाची उपलब्धता हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. परदेशी चलनाचा उपयोग शहाणपणाने करण्यात आलेला नाही. १९५६-५७ साली भारताच्या परदेशी चलनाची पुंजी ७२० कोटी रुपयांची होती. तिला गळती लागून ती आता २०० कोटी रुपयांइतकीच शिल्लक राहिली आहे. उद्योगधंद्यांचा विकास साधताना अवजड उद्योगधंद्यांवर अधिक भर देण्यात आलेला आहे आणि परदेशी चलन वाचविण्याच्या दृष्टीने हे पाऊल बरोबरच आहे. तथापि, ग्रामोद्योगांच्या विकासासाठी देण्यात आलेले ३०० कोटी रुपये सर्वस्वी अनाठायी खर्च झाले. अंबर चरख्यासारख्या योजना यंत्रांच्या स्पर्धेशी टिकाव धरू शकणे केव्हाही अशक्यच होते. कांही लोकांची अशी कल्पना आहे की आर्थिक योजना ह्या कचेऱ्यांत बसून तयार करता येतात. पण वस्तुस्थिती तशी नाही. योजनांतील आणखी एक दोष सांगितला पाहिजे. योजनेमधील विकासाच्या कामाची पुरेशी तयारी झाल्याशिवाय कामाच्या अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात येतो. त्यामुळे नवनवीन अडचणींना तोंड द्यावे लागणे अपरिहार्य होते. अशाप्रकारचे एक उदाहरण म्हणून तुंगभद्रा नदीवरील योजनेकडे बोट दाखविता येईल.

---

### औद्योगिक नियोजन आणि आर्थिक स्वावलंबन

नियोजन समितीचे एक सभासद श्री. आर. वेंकटरामन् ह्यांनी मुंबई येथे भरविण्यात आलेल्या परिसंवादात असे उद्गार काढले की, औद्योगिक विकास साधताना देशांतर्गत तंत्रशास्त्रावर अधिकाधिक प्रमाणात विसंबले पाहिजे. गेल्या २० वर्षांत भारताने आर्थिक नियोजनाच्या साह्याने विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. इतक्या थोड्या अवधीत भारताने केलेल्या प्रगतीइतकी प्रगती दुसऱ्या कोणत्याही देशाने केलेली नाही. भूतकाळात भारताने विकासासाठी परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीवर बरीच भिस्त ठेवली होती. परंतु ह्या पुढील काळात परदेशीय मदतीवर फारशी नजर देऊन चालणार नाही. तसे करणे धोक्याचे ठरेल. देशापुढील प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करताना जास्तीत जास्त स्वावलंबनाची कास धरली पाहिजे. त्यासाठी देशातल्या देशातच साधनसंपत्तीची अधिक जमवाजमव करण्यात आली पाहिजे. भारताने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याची जोखीम झपाट्याने वाढत चाललेली आहे. म्हणून उत्पन्न वाढविण्याचे नवे नवे मार्ग शोधून काढून देशातील साधनसंपत्ती वाढविणे अतिशय अगत्याचे झालेले आहे. भारतात अनेक कंपन्या परदेशांतील कंपन्यांशी सहकार्य करून काढण्यात आलेल्या आहेत. अशा कंपन्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला तर डोळ्यांपुढे उभे राहणारे चित्र फारसे समाधानकारक नाही. ह्या कंपन्यांनी निर्यात वाढविण्याचे काम अपेक्षेप्रमाणे केलेले नाही. भारताच्या आजच्या परिस्थितीत निर्यातवाढीचे महत्त्व मुद्दाम सांगण्याचे कारण नाही. उद्योगधंद्यांना सल्ला देण्याच्या कामी काहीतरी योजनापूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ह्या बाबतीतील परावलंबन घातकी ठरण्याचा संभव असतो.

---

### इंजिनिअर होण्याचे आकर्षण कमी झाले

गेल्या एकदोन वर्षांत इंजिनिअर्समध्ये पसरलेल्या बेकारीने सरकारचे व शिक्षणतज्ज्ञांचे लक्ष वेधून घेतले आहे. पदवीधर इंजिनिअर्स आणि डिप्लोमावाले इंजिनिअर्स ह्यांना नोकऱ्या देण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. तरीसुद्धा अजूनही ४०,००० इंजिनिअर्स अद्याप बेकार आहेत. इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात यावयाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत कपात करावी असा एक उपाय भारत सरकारने सुचविला आहे. दरवर्षी इंटर सायन्स परीक्षेचा निकाल लागल्यावर इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची एकच गर्दी उडत होती. परंतु यंदा मात्र प्रवेशासाठी झुंबड उडालेली नाही. फक्त पाटणा शहरात इंजिनिअरिंग कॉलेजात मात्र कांहीशी गर्दी दिसून येत आहे. मुंबईतील कॉलेजांतील जागा हळूहळू भरत आहेत.

प्रवेशावर निर्बंध घालण्याची भारत सरकारची सूचना बहुतेक राज्यांनी अमलात आणली आहे. महाराष्ट्र सरकारने मात्र सूचना अमलात आणण्याचे अमान्य केले आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रातील इंजिनिअरिंग कॉलेजांत १,६०० जागा होत्या त्या सर्वच्या सर्व भरल्या गेल्या. यंदा प्रवेश मिळविण्यासाठी फारशी गर्दी नाही. तथापि सर्व जागा लवकरच भरल्या जातील असे दिसत आहे. मध्यप्रदेशात इंजिनिअरिंगच्या ५०० पदवीधरांना सार्वजनिक बांधकाम खात्यात सामाऊन घेण्यात आले आहे. मात्र त्यांना दैनिक रोजगारीवर काम देण्यात येत आहे. मध्यप्रदेश सरकारने इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध घालण्याचे अमान्य केले आहे. तसे केल्यास कॉलेजांच्या आर्थिक परिस्थितीवर वाईट परिणाम होईल असे राज्य सरकारचे म्हणणे आहे.

---

### मुंबईच्या परिसरातील कारखान्यांची गर्दी

मुंबई शहरांत आणि त्याच्या आसपासच्या परिसरात कारखान्यांची फार गर्दी झालेली आहे. ह्या गर्दीची तपशीलवार माहिती फॅक्टरी कायद्याच्या अंमलबजावणीच्या अहवालावरून मिळू शकते. १९६५ साली महाराष्ट्र राज्यात, ९,४७२कारखाने चालू होते. त्यांपैकी ५६·०५ टक्के म्हणजे निम्यापेक्षाही थोडे अधिक कारखाने मुंबईपासून ठाण्यापर्यंत पसरलेल्या औद्योगिक भागात होते. ह्या कारखान्यांतून कामगारांच्या एकूण संख्येपैकी ७०·१६ टक्के लोक काम करीत होते. १९६४ साली नोंदणी झालेल्या राज्यांतील कारखान्यांची संख्या ९,७५७ होती. १९६५ साली ही संख्या १०,०८४ पर्यंत वाढली. १९६४ साली ९,२०७ कारखाने चालू होते. औद्योगिक विभागातील आरोग्यरक्षणाच्या सोयीत वाढ झालेली नाही. कारण, मुंबई शहरातील लोकवस्ती अधिकच दाट होत असून त्यामानाने पाण्याचा पुरवठा सुधारलेला नाही. राज्यात साखरेचे व रासायनिक कारखाने वाढत्या संख्येने निघत आहेत. ह्या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या अनिष्ट पदार्थांची विल्हेवाट कशी लावावी हा प्रश्नही बिकट होऊन बसला आहे. कारखान्यांतील कामाची परिस्थिती आणि मोकळ्या हवेची उपलब्धता ह्यांकडे अधिक लक्ष पुरविण्यात येत आहे. १५२ कारखान्यांची तपासणी करण्यात आली असता त्यांपैकी निम्म्या कारखान्यांत मोकळी हवा खेळण्यासाठी व्यवस्था करण्यात आली नव्हती असे आढळले. कारखान्यांतील अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. अहवालाच्या वर्षात एकूण ५०,७१७ अपघात झाले. त्यांपैकी ९५ प्राणघातक ठरले. १९६१ साली हे आकडे अनुक्रमे ४०,५६४ व ९० असे होते. पुष्कळशा कारखान्यांतून चांगल्या उपहारगृहांची सोय केलेली आहे. नागपूरमधील एका कारखान्याला उपाहारगृहासाठी दरसाल ७६,००० रुपये मदत द्यावी लागते.

### सोयाबीनच्या तेलाच्या साठ्याचे काय करावे ?

भारताच्या सरकारी व्यापार महामंडळाने अमेरिकेकडून आयात केलेल्या ६६ हजार टन सोयाबीनच्या तेलामुळे मंडळापुढे बिकट प्रश्न उत्पन्न झाला आहे. सोयाबीनचे तेल खाद्यतेल आहे. परंतु तेल वाईट झाल्यामुळे आता त्याचा खाण्यासाठी उपयोग करता येणार नाही. म्हणून ते साबणाच्या कारखानदारांना विकण्याची खटपट चालू आहे. दर टनाला २,३०० रुपये या दराने मंडळाने कारखानदारांना तेल देण्याची तयारी दाखविली आहे. परंतु ह्या किंमतीला सदर तेल घेण्यास कारखानदार तयार नाहीत. गेल्या वर्षी भारतात सर्वत्र वेळेवर आणि पुरेसा पाऊस पडला. त्यामुळे शेंगदाण्याचे पीक भरपूर आले. अर्थातच शेंगदाण्याच्या तेलाचे उत्पादन व पुरवठा सुधारला आणि बाजारात तेल भरपूर मिळू लागले. त्यामुळे आयात केलेले सोयाबीनचे तेल बाजारात विकण्याची गरजच भासली नाही. तथापि व्यापार महामंडळाने देशात शेंगदाण्याचे तेल आयात केले त्या वेळची परिस्थिती वेगळी होती. त्या वेळी देशात शेंगदाण्याच्या तेलाची तीव्र टंचाई होती. ह्या टंचाईला तोंड देण्यासाठी मंडळाने ४५ हजार टन सोयाबीनच्या तेलाचा साठा केला. परंतु शेंगदाण्याचे तेल विपुल मिळू लागल्याने आयात केलेल्या तेलापैकी फक्त ४ हजार टन तेलच मंडळाला विकता आले. आयात केलेल्या तेलाची मूळची किंमत टनाला २,७०० रुपये होती. ती नंतर २,३०० रुपये करण्यात आली. तरीही तेलाला गिऱ्हाईक भेटेना. साबण कारखानदार ह्या दराने तेल घेण्यास तयार नाहीत. शिवाय साबणाच्या कारखान्यांत बऱ्याच प्रमाणात स्वस्त दराचे आळशीचे तेल आणि लिंबाच्या बियांचे तेल वापरण्यात येते. सरकारी व्यापार महामंडळापुढे हा एक अवघड प्रश्न उभा ठाकला आहे.

---

### दुधाच्या कमतरतेची समस्या

भारतात तर माणशी दुधाची उपलब्धता फक्त १३० ग्रॅम्स आहे; त्याची जागतिक सरासरी ३०३ ग्रॅम्स असून, स्वित्झरलँडमधील दर माणशी उपलब्धता ७४१ ग्रॅम्स, न्यूझीलंडमधील ६३७ ग्रॅम्स, अमेरिकेतील ६२३ ग्रॅम्स आणि ग्रेटब्रिटनमधील ५०९ ग्रॅम्स आहे. भारतातील दरमाणशी उपलब्धतेत गेल्या १० वर्षांत काहीच वाढ झालेली नाही. पण दूध देणाऱ्या जनावरांची संख्या मात्र लोकसंख्येप्रमाणेच वाढत चालली आहे. भरपूर दूध देणाऱ्या जनावरांशी संकर करून दुधाची उत्पत्ती वाढविण्याचे प्रयत्न "दि हीफर प्रॉजेक्ट, यू. एस. ए." आणि "दि सोसायटी फॉर दोज टू हॅव लेस" ह्या अनुक्रमे अमेरिकन आणि ऑस्ट्रेलियन संघटनांच्या मदतीने आणि हिंदी जनावरांची अवलाद सुधारण्याचे प्रयत्न इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च करीत आहे.

## आचाराशिवाय प्रचार!

जगातील अनेक प्रमुख देशांतील विद्यार्थ्यांच्या मनात अस्वस्थतेने मूळ धरलेले आहे. फ्रान्समधील विद्यार्थ्यांनी केलेल्या दंगली ताज्याच आहेत. भारतामधील विद्यार्थीही असमाधानाच्या ह्या लाटेतून सुटलेले नाहीत. स्थानिक कारणे वेगवेगळी असली तरी अस्वस्थतेचा उद्रेक भारतामधील बहुतेक राज्यांत कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो. भारताचे माजी अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् ह्यांनी एका धार्मिक पुढाऱ्याबरोबर ह्या विषयासंबंधी चर्चा केली. चर्चेत ते म्हणाले की, तरुण पिढीत अस्वस्थता वाढीस लागण्याची दोन मुख्य कारणे आहेत. शिक्षण घेतलेल्या तरुणांना संधी मिळत नाही, हे एक कारण आणि आर्थिक विषमता हे दुसरे कारण. विद्यार्थ्यांपुढे त्यांचे असे काही खास प्रश्न असतात. ह्या प्रश्नांची सोडवणूक सध्या देशात ज्या प्रकारची लोकशाही व समाजवाद अस्तित्वात आहेत, त्यात विद्यार्थ्यांना मिळत नाही. लोकशाही आणि समाजवाद ह्यांची सध्याची कारभारयंत्रणा अपुरी आहे. विद्यार्थ्यांना नवा ध्येयतारा नजरेसमोर ठेवण्याची इच्छा आहे. परंतु त्यांना तो अद्याप तरी दिसलेला नाही. त्यांचे शिक्षण झाल्यावर त्यांना समान संधी मिळत नाही. माणसाच्या वागणुकीला विचार, आचार आणि प्रचार ह्यांचे अधिष्ठान लाभले पाहिजे. ह्या तीनही पायऱ्या सारख्याच महत्त्वाच्या आहेत. दुर्दैवाने आज भारतात आचाराशिवाय प्रचार करण्याची पद्धत पडलेली आहे. जे धार्मिक पुढारी आचारसंपन्न आहेत अशा लोकांनीच प्रचाराचे काम केले पाहिजे. तेच ह्या कामासाठी लायक आहेत. सत्य आणि अहिंसा हे धर्माचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. लोकांनी दोन्ही मूल्ये आपल्या अंगी बाणवून घेऊन ती आचारात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

---

## ब्रिटिश डॉक्टरांना अमेरिकेत येण्यास बंदी

ब्रिटन व पश्चिम युरोपातील अनेक देशांतून शेकडो डॉक्टर्स, शास्त्रज्ञ आणि कुशल कामगार अमेरिकेत स्थलांतर करतात. अमेरिकेतील सुबत्ता त्यांना आकर्षित करीत असते. दीर्घ काल शिकून तयार झालेल्या ह्या कसबी लोकांच्या स्थलांतरामुळे ब्रिटिश सरकार व लोक अस्वस्थ झाले होते. ह्यासंबंधी ब्रिटनने अमेरिकेकडे तक्रारही केलेली आहे. आता अमेरिकेनेच ह्या लोकांच्या येण्याचे दार बंद केले आहे. आतापर्यंत प्रत्येक देशाकडून अमेरिकेत येणाऱ्या लोकांची संख्या अमेरिकेने ठरवून दिलेली असे. आता मात्र पूर्वगोलार्धातून एकूण येणाऱ्यांची कमाल एकूण संख्याच १ लाख, ७० हजार ठरविण्यात आली आहे. आता अमेरिकेत येणाऱ्यांच्या अर्जाची तारीख लक्षात घेऊनच अनुक्रम लावण्यात येईल. अमेरिकेचे निर्बंध दोन वर्षे चालू राहतील.

## युनिट ट्रस्टमधील गुंतवणुकीला वाढता पाठिंबा

भांडवलाची सुरक्षितता आणि स्थिर, पण वाजवी उत्पन्न ह्या दोन कसोट्या पैसे गुंतवणुकीच्या बाबतींत महत्त्वाच्या मानल्या जातात. समाजातील ज्या वर्गाचे उत्पन्न फारसे वाढण्याची अगर एकदम कमी होण्याची शक्यता नसते त्या वर्गाला अशा गुंतवणुकीचे आकर्षण अधिक वाटत असते. युनिट ट्रस्टमध्ये लोक करीत असलेल्या वाढत्या गुंतवणुकीवरून ह्या गुंतवणुकीचे आकर्षण वाढत चालल्याचे दिसून येते. जून, १९६८ अखेर संपलेल्या वर्षी युनिट ट्रस्टने ७ टक्के नफा जाहीर केलेला आहे. जून १९६७ अखेरही ट्रस्टने ७ टक्केच नफा जाहीर केलेला होता. त्यापूर्वीच्या म्हणजे १९६५–६६ ह्या वर्षी मात्र ६·१ टक्के नफा जाहीर करण्यात आला होता. अहवालाच्या वर्षी १५·३० कोटी रुपये किंमतीची युनिट्स् विकण्यात आली, त्यासाठी ५७ हजारापेक्षा थोडे अधिक अर्ज आले होते. त्यापूर्वीच्या वर्षी ४१,५७० अर्ज आले होते व युनिट ट्रस्टची प्रत्यक्ष विक्री ९·२४ कोटी रुपयांची झाली होती. १९६८ च्या जून अखेर ट्रस्टच्या खातेदारांची संख्या २ लाख १८ हजार होती. त्यांनी धारण केलेल्या युनिट्सची किंमत ४१ कोटी रुपये होती. अहवालाच्या वर्षी ट्रस्टला ३·६७ कोटी रुपये उत्पन्न झाले. त्या पूर्वीच्या वर्षी २·५१ कोटी रुपये उत्पन्न झाले होते. खातेदारांना ७ टक्के नफ्याचे वाटप करण्यासाठी २·८८ कोटी रुपये लागतील. ट्रस्टचे अध्यक्ष श्री. भट्ट ह्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की भांडवल गुंतवणुकीच्या देशातील वातावरणात सुधारणा झाली असून युनिट ट्रस्टच्या विक्रीत आणखीही वाढ देण्याची अपेक्षा आहे. ह्या वर्षी चांगला पाऊस झाला तर एकूण अर्थव्यवस्थेलाच चांगली गती मिळण्याची खात्री वाटते. उद्योगधंद्यांतही मंदीची धारणा जाऊन प्रगतीची चिन्हे दिसत आहेत.

---

## राष्ट्रीय संरक्षण निधीची रक्कम

भारताच्या संरक्षणनिधीत हळूहळू भर पडत चालली आहे. २९ जून, १९६८ पर्यंत संरक्षण निधीची रक्कम ८०·८४ कोटी रुपयांपर्यंत पोचली होती. ह्या रकमेपैकी २०·२१ कोटी रुपयांची रक्कम १ सप्टेंबर, १९६५ पासून गोळा झालेली आहे. ह्याच वेळी भारत-पाकिस्तान संघर्ष उग्र स्वरूप धारण करू लागला होता. निधीत भर म्हणून सोन्याचे व चांदीचे दागिने अगर इतर वस्तूही देण्यात येत होत्या त्यांची किंमत १·१६ कोटी रुपये झाली. २९ जून १९६८ पर्यंत सोन्याचे दागिने आणि जडजवाहिर ह्यांच्या स्वरूपात २६·७४ लाख ग्रॅम वजनाच्या मूल्यवान वस्तू जमा झाल्या. चांदीच्या व रत्नजडित इतर वस्तूंचे वजन १५·६६ लाख ग्रॅम भरले.

---

## भारतातील परदेशी कंपन्यांमधील वरिष्ठ अधिकारी आता ९० % भारतीय

परदेशी मालकीच्या आणि परदेशी नियंत्रणाखालील कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाचे हिंदीकरण आता ९०% पर्यंत वाढले आहे, असे १९६६ संबधीच्या आकडेवारीवरून दिसून येते. परंतु, दरमहा ५,००१ रु. पेक्षा जास्त पगाराच्या जागी मात्र बिगरभारतीयांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे.

एक हजार रुपयांपेक्षा जास्त पगाराच्या जागी अशा कंपन्यांतून २१,०६७ ( ९०.५% ) भारतीय आणि २,२१८ ( ९.५%) बिगर-भारतीय होते.


१९५६ ते १९६७ ह्या मुदतीत ह्या पगाराच्या जागा ११,४२८ च्या २३,२८५ झाल्या, परंतु बिगरभारतीयांची संख्या ६,५६६ ( ५७·५% ) वरून २,२१८ ( ९·५% ) वर उतरली. ह्या उलट, भारतीयांची संख्या ४,८६२ ( ४२·५% ) ची २१,० ६७ ( ९०·५% ) झाली.

जुन्या उद्योगधंद्यांतून भारतीयांचे प्रमाण सरासरी प्रमाणापेक्षा खूपच कमी आहे. मळे ( ३·८%), वाहतूक कंपन्या ( ७६·२% ), बँका ( ७७% )

---

## नाल सरोवराचा प्रवाशांसाठी विकास

अहमदाबाद शहरापासून ४० मैलांवर नाल नामक एक सरोवर आहे. सरोवराकाठची वनश्री रम्यतेने नटलेली आहे. हे ठिकाण पक्ष्यांचे अभयस्थान म्हणून राखून ठेवण्यात आलेले आहे. पक्षिगणांचा अभ्यास करण्यासाठी अनेक हौशी लोक तेथे जात असतात. आता ह्या ठिकाणाचा विकास करण्याची योजना हाती घेण्याचे गुजरात सरकारने ठरविले आहे. सध्या ह्या ठिकाणी हौशी प्रवाशांना राहण्यासाठी फारशा सोयी उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते ह्या निसर्गरम्य ठिकाणाकडे फारसे आकर्षित होत नाहीत. गुजरात सरकारच्या संकल्पित योजनेप्रमाणे सरोवराच्या परिसरात आता एक प्रशस्त बंगला बांधण्यात येणार आहे. त्याशिवाय वीजपुरवठा करण्यात येणार असून बाग आणि पदार्थसंग्रहालयही उभारण्यात येणार आहे. संग्रहालयात मुख्यतः पेंढा भरलेले विविध पक्षी ठेवण्यात येतील. नाल सरोवराच्या परिसरात अनेक देशांतील पक्षी हंगामास अनुसरून येत असतात. डिसेंबरच्या मध्याच्या सुमारास आफ्रिका, सायबेरिया, स्विट्झरलंडसारख्या दूरच्या देशातील पक्षी ह्या भागात हिवाळा घालविण्यासाठी येतात. त्यांत काही चित्रविचित्र रंगांनी सुशोभित झालेले असतात, तर काही आपल्या कोमल कंठाने गाणारे असतात. ह्या पक्ष्यांच्या जीवनाचे निरीक्षण करण्यासाठी अनेक सोइस्कर जागा मुद्दाम तयार करण्यात येणार आहेत. नाल सरोवराची विकासयोजना अमलात आणण्यास बराच खर्च येणार आहे. परंतु हौशी प्रवाशांच्या भेटी अधिक होऊ लागल्यास तो सहज भरून निघेल.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
“ विजय ” नांगर
वापरा.

४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
• बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
• मजबूत बांधणी
• अद्यावत् यंत्र योजना
• साईज १४", १६", १८"
फोन नं. १६९

उत्पादक –
भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## भारत सरकारची परदेशीय कर्जे

( आकडे लक्ष रुपयांचे )

| सावकार | फेब्रुवारी, १९६८ अखेरचे बाकी देणे | १९६८ मध्ये यावयाचे व्याज |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ : परदेशी चलनात परतफेड करावयाची कर्जे | | |
| ऑस्ट्रेलिया | १,२०८ | ७२ |
| बेल्जम | १५ | ०२ |
| कॅनडा | ४,३५३ | २५९ |
| जर्मनी | ३८,७७७ | १,७८३ |
| फ्रान्स | ५७० | ३५ |
| इटली | १४२ | ०३ |
| जपान | १९,३६६ | १,२६० |
| नेदरलंडस् | २,६८१ | १२५ |
| ग्रेट ब्रिटन | ४५,७२२ | १,४७१ |
| अमेरिका | १,३९,९५२ | २१६४ |
| आय बी आर डी | २५,३४२ | १,४४७ |
| आय डी ए | ६०,३०५ | ५२९ |
| बेहरीन | ६७० | २७ |
| डेन्मार्क | ४५५ | ०७ |
| कुवेत | २,१५० | ८७ |
| स्वीडन | २६६ | ०५ |
| स्वित्झरलंड | १,८५३ | १४५ |
| एकूण अ- | ३,४३,८२४ | ९,४२१ |
| ब: मालाच्या निर्गतीचे द्वारा परतफेड करावयाची कर्जे | | |
| झेकोस्लोव्हाकिया | ३,८९७ | १०५ |
| पोलंड | १,७८० | ४५ |
| रशिया | ३९,२७६ | १,०९८ |
| युगोस्लाव्हिया | २०१९ | ५७ |
| एकूण ब- | ४६,९७२ | १,३०५ |
| क: रुपयाच्या चलनात परतफेड करावयाची कर्जे | | |
| डेन्मार्क | ९६ | ०५ |
| अमेरिका (पी एल ४८० कर्जे वगळून) | ३१,३४१ | १,२६२ |
| एकूण क- | ३१,४३७ | १,२६७ |
| एकूण कर्जे (अ+ब+क) | ४,२२,२३३ | ११,९९३ |

### रेडिओला होणारे जाहिरातींचे उत्पन्न

रेडिओवरून देण्यात येणाऱ्या व्यापारी जाहिरातींना सुरुवात झाल्यास काही काळ लोटला आहे. परदेशात रेडिओवरील जाहिरातींचा उपयोग चांगला होतो. पुढारलेल्या देशांत रेडिओ-प्रक्षेपण अधिक विस्तृत झालेले आहे. भारतात हा प्रयोग नवाच म्हणावा लागेल. ऑल इंडिआ रेडिओला व्यापारी जाहिरातींच्या प्रक्षेपणापासून दरमहा सुमारे ३·८ लाख रु. प्राप्ती होते.ही प्राप्ती अंदाजापेक्षा थोडी अधिकच आहे. व्यापारी जाहिरातींसाठी देणे शक्य असलेल्या वेळापेक्षा अधिक वेळाची मागणी येत आहे. बहुतेक सर्व जाहिराती मुंबईमधील जाहिरातसंस्थांकडून आलेल्या असतात. तथापि कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास ह्या शहरांतील संस्थांकडूनही जाहिराती देण्यात येतात. नागपूर आणि पुणे ह्या ठिकाणांहून मात्र रेडिओसाठी जाहिराती आलेल्या नाहीत. ९० टक्के जाहिराती इंग्रजी भाषेतून प्रक्षेपित करण्यात येतात. ७ टक्के जाहिराती हिंदी भाषेत देण्यात येतात. मराठीतून २ टक्के आणि गुजरातीमधून १ टक्का जाहिराती देण्यात येतात.

### सिलोनी जाहिरातींमधील 'काळे तामीळ'

सीलोनच्या टूरिस्ट बोर्डाच्या ग्रेट ब्रिटनमधील जाहिरातींमुळे सीलोनमधील तामिळी लोकांत खळबळ उडाली आहे. "आमच्या देशात येऊन सिंहलसुंदरींना आणि काळ्या तामिळी लोकांना प्रत्यक्षच पाहा" असे त्या जाहिरातीतून आवाहन करण्यात आलेले आहे. दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या धर्तीवर जाण्याचे सीलोनचे हे पहिले पाऊल आहे, असे मानले जात आहे.

**खासदारांकडे सरकारची बाकी**–पार्लमेंटचे माजी सभासद आणि काही माजी मंत्री ह्यांच्याकडून मध्यवर्ती सरकारला भाड्यापोटी १·५ लाख रुपये यावयाचे आहेत. ही थकबाकी २५० जणांकडून यावयाची असून थकबाकीची व्यक्तिशः रक्कम १०० रुपयांपासून काही हजारांपर्यंत आहे. बाकी वसूल करण्याच्या बाबतीत सरकारला फारसे यश आलेले नाही. काही थकबाकीदार मरण पावल्यामुळे त्यांच्याकडे येणे असणारी रक्कम बुडीत खाती टाकावी लागणार आहे.

**छांब भागात ज्वालाग्राही वायू** – जम्मूपासून ४५ मैलांवर असलेल्या एका खेड्याजवळ ज्वालाग्राही वायू सापडला आहे. पंप बसविण्यासाठी खोदकाम चालू असता सुमारे ६० फूट खोलीवर वायूचा साठा सापडला. तो कित्येक दिवस तसाच जळत राहिला होता. तेल आणि नैसर्गिक वायु-मंडळाचे तज्ज्ञ ह्या भागाकडे तातडीने रवाना करण्यात आले.

अर्थ (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाधिवास" पुणे ४.

### हृदयविकारावर विषापासून औषध

यंत्रयुगातील धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात हृदयविकाराने निधन पावणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली आहे. रक्ताभिसरणात बिघाड उत्पन्न झाल्यामुळे हा विकार होतो. ह्या विकारावर विषापासून तयार करण्यात आलेले एक औषध प्रभावी ठरले असल्याची वार्ता आहे. मलायातील एका विषारी जातीच्या सर्पाच्या विषापासून ते तयार करण्यात आले आहे. पायातील रक्ताभिसरण रक्ताच्या गुठळीमुळे थांबल्यास त्यावर ह्या औषधाचा उपाय चांगला लागू पडतो, असे आढळून आले आहे. रक्ताची गुठळी होण्याची प्रक्रिया होऊन न देण्याचे कार्य ह्या औषधाने होते. हृदयविकारातही हीच प्रक्रिया प्राणघातक ठरते. ब्रिटनमधील दोन औषधी प्रयोगशाळांत केलेले ह्या औषधाचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. ह्या औषधामुळे रक्तात नवे दोष उत्पन्न होत नाहीत.

### गंगेचे पाणी शुद्ध राखण्याचा प्रयत्न

नव्याने औद्योगीकरण होऊ घातलेल्या देशांत अनेक प्रश्न प्रथमच उत्पन्न होत असतात. वास्तविक प्रगत देशांत हे प्रश्न ह्यापूर्वीच उत्पन्न झालेले असून तेथील विचारवंत धोक्याचे इशारेही देत आहेत. अमेरिकेत नद्यांचे पाणी औद्योगिक कारखान्यांतील सांडपाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर दूषित झालेले आहे. हा धोका टाळण्यासाठी हृषिकेश येथील कारखान्याने उपाययोजना केली आहे. रशियाच्या मदतीने काढण्यात आलेल्या तेथील औषधी कारखान्यासाठी गंगेचे पाणी मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येते. औषधे करण्याच्या प्रक्रियेत पाणी दूषित होते. म्हणून ते तसेच नदीत सोडणे धोक्याचे आहे. वापरलेले पाणी नदीत सोडण्यापूर्वी त्याचे शुद्धीकरण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी ८० लाख रुपयांची यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे.

### भारत सरकारच्या कर्जाचा तपशील

( आकडे कोटी रु. चे )

| | १९५०-५१ | १९५५-५६ | १९६०-६१ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ (दुरुस्ती) | १९६८-६९ (अंदाज) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अंतर्गत कर्जे | २,०२२ | २,३२९ | ३,९७५ | ५,४१५ | ६,२१४ | ६,५५६ | ६,९२९ |
| परदेशी कर्जे | ३२ | ११४ | ७६१ | २,५९० | ४,६२३ | ५,४०१ | ६,२२५ |
| एकूण कर्ज | २,०५४ | २,४४३ | ४,७३६ | ८,००५ | १०,८३७ | ११,९५७ | १३,१५४ |
| इतर देणी | ८११ | १,०६८ | १,८०८ | ३,३२४ | ३,५१८ | ३,९०२ | ४,१३६ |
| एकूण देणी | २,८६५ | ३,५११ | ६,५४४ | ११,३२९ | १४,३५५ | १५,८५९ | १७,२९० |
| राष्ट्रीय उत्पन्न | ९,५३० | ९,९८० | १४,१४० | २०,३४० | २३,१२० | — | — |
| एकूण देण्याचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण | ३०.१ | ३५.२ | ४६.३ | ५५.७ | ६२.१ | — | — |

### शेड्यूल्ड बँकांचा कर्जपुरवठा—उद्देशानुसार वर्गवारी

| | ३१ मार्च, १९६५ | | | ३१ मार्च, १९६६ | | | ३१ मार्च, १९६७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाती (संख्या) | रक्कम (कोटी रु.) | % | खाती (संख्या) | रक्कम (कोटी रु.) | % | खाती (संख्या) | रक्कम (कोटी रु.) | % |
| उद्योगधंदे | ६३,६९१ | १२४६.२० | ५९.५ | ६५,०९३ | १४७०.९७ | ६२.७ | ७४,४४३ | १७४७.२५ | ६४.३ |
| व्यापार | १७४,१२४ | ५३६.७८ | २५.२ | १६०,६७१ | ५७२.९७ | २४.४ | १३०,५८४ | ५२६.५० | १९.४ |
| आर्थिक संस्था | १५,३४० | ९४.२३ | ४.५ | १०,९९० | ७७.५९ | ३.३ | ११,२८६ | ९६.८२ | ३.६ |
| शेती | ६१,०९८ | ५८.२६ | २.८ | ४७,४९६ | ५६.५४ | २.४ | ४६,६८५ | ५६.६४ | २.१ |
| वैयक्तिक | ७२८,२०६ | १०९.२२ | ५.२ | ६७१,४८५ | १०७.७९ | ४.६ | ६०२,९३२ | ११४.७८ | ४.२ |
| इतर | ८३,९३८ | ५०.०५ | २.४ | ६३,१४८ | ६०.९४ | २.६ | १८९,३२४ | १६१.३८ | ५.९ |
| एकूण | ११,२६,३९७ | २०९४.७४ | १००.० | १०,१८,८८३ | २३४६.८० | १००.० | १०,५५,६७९ | २७१६.४७ | १००.० |

**हायकोर्टातील तुंबलेले काम** — न्यायाला विलंब लागला म्हणजे तो नाकारल्यासारखाच होतो असे म्हणतात. भारतामधील हायकोर्टातील तुंबलेल्या प्रकरणांचा आकडा ह्याची साक्ष देत आहे. गेल्या वर्षाच्या अखेर सर्व हायकोर्टात मिळून ३ लाख, ३४ हजार, ६२० प्रकरणे साठून राहिलेली होती. त्यातील १ लाख, २२ हजार दावे २ वर्षांपेक्षा अधिक काळ दप्तरी पडून राहिलेले होते. हायकोर्ट जज्जांची अपुरी संख्या ह्याला कारण आहे.

**गहू पिकातील क्रांतीचे तिकीट** — ह्या वर्षी भारतात गव्हाचे पीक अपरंपार आलेले आहे. ह्या घटनेप्रीत्यर्थ भारत सरकारने एक खास पोष्टाचे तिकीट काढण्याचे ठरविले आहे. हे तिकीट २० पैशांचे असेल आणि ते ह्या महिन्याच्या मध्याच्या सुमारास काढले जाईल. त्यावर 'गहू क्रांति १९६८' अशी अक्षरे असतील. ह्या तिकिटाशिवाय आणखी १८ खास तिकीटे काढण्यात येणार आहेत.

**इतिहासपूर्वकालीन चित्रे**—मध्यप्रदेशातील नरसिंहगड जवळील डोंगरात इतिहासपूर्वकालीन मानवाच्या कांही गुहा सापडल्या आहेत. ह्या गुहांमधून त्या कालातील अनेक चित्रे काढलेली आहेत. त्यावरून तत्कालीन मानवी जीवनाची कल्पना येते. मृगयावस्थेतील मानवाने शिकारीचीच अधिक चित्रे काढलेली आढळतात.

**खासदारांना चित्रवाणीचे सेट्स** —लोकसभेच्या सभासदांना चित्रवाणीचे सेट्स मोफत देण्याच्या योजनेस मध्यवर्ती सरकारने मंजुरी दिली आहे. परदेशांतून आयात करण्यात आलेले सेट्स खासदारांच्या निवासस्थानी बसविण्यात येणार आहेत. कारण, देशी बनावटीचे सेट्स तयार होण्यास विलंब लागत आहे. तथापि परदेशीय चलनाच्या टंचाईमुळे योजना अमलात येण्यास वेळ लागणार आहे.

**हिंदी चित्रपटांवर निर्बंध**—सिलोनच्या सरकारने परदेशीय चित्रपटांच्या अनिर्बंध आयातीवर नियंत्रण घालण्याचे ठरविले आहे. निर्बंधाची अंमलबजावणी सुरू झाल्यावर हिंदमधील चित्रपटाच्या धंद्यावर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. सिलोनमधील चित्रपटनिर्मात्यांच्या संघटनेने परदेशी चित्रपटाच्या मुक्त आयातीमुळे सिलोनमधील चित्रपटाच्या धंद्याला धोका पोचला आहे, अशी तक्रार केली आहे.

**स्वीडनचे भारताला कर्ज**—स्वीडनने भारताला १०.८ कोटी रुपयांचे कर्ज देण्याचे कबूल केले आहे. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाची व यंत्रसामुग्रीची आयात करण्यासाठी त्याचा उपयोग करावयाचा आहे. त्याशिवाय खाणी आणि विद्युत्पादनाच्या सरकारी योजनांसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीसाठीही कर्जाचा उपयोग करता येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या २८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड
( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )
आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.
मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

**अमेरिकेकडे हिंदी कपड्यांची निर्यात** — 'जवाहर जाकिटे' (बंद गळ्याचे कोट) अमेरिकेत लोकप्रिय झाली आहेत. हे कोट, लांब शर्ट आणि पायजमे निर्यात करण्याच्या योजना आखण्यात सरकारी हँडिक्रॅफ्टस् अँड हँडलूम एक्सपोर्ट कॉर्पोरेशन दंग आहे. ह्या नव्या अमेरिकन फॅशनचा फायदा घेण्यासाठी कपुरथळा संस्थानचे २१ वर्षे वयाचे महाराजकुमार मार्तंडसिंह ह्यांनी एक फर्म काढली आहे. अमेरिकन तरुण-तरुणींना पसंत पडतील असे चित्रविचित्र कपडे तयार करून निर्गत करण्याचा त्यांचा विचार आहे.

**कार्यक्षम साधनांचा प्रभाव** —अमेरिकेतील जननाचे प्रमाण १९६० मध्ये दरहजारी २४·९ होते, ते १९६७ मध्ये १७·९ वर उतरले. नव्या आणि अधिक प्रभावी संतती प्रतिबंधक साधनांचा सर्वत्र झालेला प्रसार, हे त्याचे कारण आहे.

**अठरा वर्षाच्यांना मतदानाचा अधिकार** —मतदानाच्या अधिकाराचे वय अमेरिकेत २१ वर्षे आहे, ते १८ वर्षे करण्यासाठी प्रेसिडेंट जॉन्सननी घटनेत दुरुस्ती सुचविली आहे. १८ वर्षांचे अमेरिकन तरुण अमेरिकेसाठी व्हिएटनाममध्ये लढू शकतात तेव्हा ह्या वयाच्यांना मतदानाचा अधिकार देणे योग्य असे त्यांचे म्हणणे आहे.

**दोन जंबो जेटसाठी ५० कोटी रु. चे कर्ज** —एअर इंडियाला बोइंग एअर क्राफ्ट कंपनीकडून दोन जंबो जेट विमाने विकत घेता यावीत, ह्यासाठी एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेने २·५ कोटी डॉलर, १३ अमेरिकन बँकांनी ३·२३ कोटी डॉलर आणि २७ लक्ष डॉलर बोइंग कंपनीने कर्ज दिले आहे.


**अमेरिकन समाजाचा अधःपात** —अमेरिकन समाजाचा अधःपात झालेला आहे, असे शेकडा ३३ अमेरिकनांना वाटते. पालकांचे आणि न्यायमंदिराचे दुर्लक्ष आणि अनीतीचा आणि धर्माचा कमी होत चाललेला पगडा, ह्यांचा तो परिणाम आहे. गॅलप इन्स्टिट्यूटने केलेल्या पाहाणीचा हा निष्कर्ष आहे.

**नटीने १० लक्ष रुपयांस चित्र खरीदले** — एलिझाबेथ टेलर ह्या नटीने लंडन येथील चित्रांच्या एका लिलावात, क्लॉड मॉनेच्या एका निसर्ग चित्राची, सर्वात मोठा लिलाव बोलून, १० लक्ष रुपयांस खरेदी केली.

**छोट्या संस्थानिकांची जास्त प्रमाणात सोय**— भारत सरकारच्या संस्थानिकांचे तनखे बंद करण्याच्या योजनेप्रमाणे, वार्षिक ३०,००० रु. पेक्षा कमी तनखा असणारांना त्यांच्या तनख्याच्या १२ पट रक्कम मिळेल. ३०,००० रु. ते १,००,००० रु. तनखेवाल्यांना त्याच्या १० पट रक्कम मिळेल आणि १,००,००० रु. वरील तनखेवाल्यांना ८ पट रक्कम मिळेल. २० वर्षांवर ही रक्कम विभागली जाईल आणि ती करमाफ असेल.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.



किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.